महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये, मुंबई

(अधिष्ठाता कार्यालय)

# GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITALS, MUMBAI

**(DEAN OFFICE)**

L.T. Marg, Near L.T. Marg Police Station, Mumbai- **40001**

**Phone No.9920527799** **Email- gmcgtmumbai@gmail.com**

क्र.शावैममुं/डीसी/जाहिरात-प्रसिध्दी/अध्यापक/चिकित्सा/३६५/२४ दिनांक १७/०८/२०२४

## ★ जाहीरात ★

विषय:- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील वरिष्ठ या संवर्गातील रिक्त पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

संदर्भ :- ०१. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: एलईसी-२०२१/ प्र.क्र.१९९/ वैसेवा-३, दि.०९/०२/२०२२

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील वरिष्ठ निवासी या संवर्गातील रिक्त असलेली पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर ३६४ दिवसांकरीता भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छूक पात्र उमेदवारांकडुन मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in व www.gmcmumbai.org या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळुन) मा अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, मुंबई- ०१ येथे अर्ज स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. तसेच मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. जितेंद्र संकपाळ)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- वरिष्ठ निवासी

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | शरिररचनाशास्त्र विभाग | २ | MD/MS/DNB in the concerned subject from recognition University for NMC Norms. | Senior Resident is one who is doing his residency in the concerned department after obtaining Medical Postgraduate degree (MD/MS/DNB). Non-medical Postgraduates with MSc (Medical) degree shall be called Tutors in whichever departments they are working. |
| २ | शरिररचनाशास्त्र विभाग | २ | | |
| ३ | जीवरसायनशास्त्र विभाग | २ | | |
| ४ | औषधनिर्माणशास्त्र विभाग | १ | | |
| ५ | विकृतीशास्त्र विभाग | २ | | |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र विभाग | २ | | |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र विभाग | १ | | |
| ८ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र विभाग | १ | | |
| ९ | औषधवैद्यकशास्त्र विभाग | ३ | | |
| १० | बालरोगचिकित्साशास्त्र विभाग | ३ | | |
| ११ | त्वचा व गुप्तरोग विभाग | १ | | |
| १२ | मनोविकृतीशास्त्र विभाग | १ | | |
| १३ | शल्यचिकित्साशास्त्र विभाग | ४ | | |
| १४ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग | २ | | |
| १५ | कान, नाक व घसाशास्त्र विभाग | १ | | |
| १६ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग | १ | | |
| १७ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग | ४ | | |
| १८ | बधिरीकरणशास्त्र विभाग | २ | | |
| १९ | क्ष- किरणशास्त्र विभाग | २ | | |
| २० | दंतचिकित्साशास्त्र विभाग | १ | | |
| | एकुण | ३८ | | |

महत्वाची टिप :-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. मानधन: **दरमहा शिक्षावृत्ती प्रचंलित शासकीय नियमानुसार असेल.**

नियम व अटी :-

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

११. सदर जाहिरात मधील नमूद पदसंख्येत बदल करणे / सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१२. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांना राहतील.

१३. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१४. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

१६. If the said post is resigned / left in between suspended / terminated the Experience Certificate will not be issued and candidate will be blacklisted for further appointment in Government Medical College, Mumbai. This selection is subject to verification of documents on scrutiny if held ineligible then the selection shall stand cancelled.

१७. Casual leave will be permissible as per rules. Leave will be permissible after prior sanction from the head of the department. Unauthorized absence indiscipline will make the candidate liable for disciplinary action, which may amount to termination of job. No Accommodation will be provided to the selected candidate. He/She will follow all the terms and conditions mentioned in the advertisement.

१८. All the rules for residency scheme as per Government Resolution No. MED-1095/2116/CR- 10/Shikshan, Mumbai-32 dated 31st January 1996, will be applicable to the selected candidates.



(डॉ. जितेंद्र संकपाळ)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१